## निशाणी क्र. १५४ वरील आदेश

प्रतिवादी क्र. २ हिने प्रस्तुतचा अर्ज तिचेविरुध्द झालेला उलट तपास नाही असा आदेश रद्द होवून वादीचा उलट तपास घेणेची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. तिच्या म्हणण्यानुसार वादीने दिनांक २५/११/२०१६ रोजी सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यानंतर प्रतिवादीतर्फे वादीचा उलट तपास घेणेकरीता दिनांक १५/२/२०१७ रोजी प्रकरण नेमले होते. सदर दिवशी प्रथम प्रतिवादी क्र. १ ने वादीचा उलट तपास घ्यावयाचा व तद्नंतर सामील प्रतिवादी क्र. ४ ते १२ यांनी व तद्नंतर प्रस्तुत प्रतिवादीने उलट तपास घ्यावयाचा होता. परंतू प्रतिवादी क्र. १ निर्वंश मयत झाल्यामुळे प्रतिवादी क्र. १ तर्फे उलट तपास घेणेत आला नाही. तद्नंतर प्रतिवादी क्र. ४ ते १२ तर्फे उलट तपास नाकारण्यात आला. प्रतिवादी क्र. २ ही नोकरीनिमित्त मुंबई येथे असते. दिनांक १५/२/२०१७ रोजी तिला कामावरुन रजा मिळू न शकल्यामुळे गावी येवून आपल्या वकीलांना भेटून वादीचा उलट तपास घेणेकामी आवश्यक ती माहिती पुरवू शकली नाही. त्यामुळे वादीचा उलट तपास त्या दिवशी घेतला नाही. त्यामुळे तिचे विरुध्द उलट तपास नाही असा आदेश केला आहे. तिला सदरचा दावा गुणदोषावर चालविणेचा आहे. त्यासाठी तिला वादीचा उलट तपास घेणेची संधी मिळणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहेत. सदरचा आदेश रद्द न झाल्यास तिचे कायदेशीर न्याय हक्कावर बाधा येवून तिचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. तरी तिने तिचे विरुध्द झालेला उलट तपास नाही असा आदेश रद्द होवून वादीचा उलट तपास घेणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जास म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश पारीत होणेबाबत विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी क्र. २ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत कामी वादीचे सरतपासाचे शपथपत्र दिनांक २५/११/२०१६ रोजी दाखल केले आहे. प्रस्तुत प्रतिवादीतर्फे सदर साक्षीदाराच्या उलट तपासाकरीता दिनांक १५/२/२०१७ इ. रोजी प्रस्तुतचे प्रकरण ठेवण्यात आले होते. त्या दिवशी प्रस्तुत प्रतिवादीने सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही, अगर उलट तपास घेण्यास मुदतीचा देखील अर्ज दिला नाही, प्रस्तुतचे प्रकरण हे सात वर्षे जुने आहे, त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादीविरुध्द सदर साक्षीदाराचा उलट तपास नाही असा आदेश पारीत करणेत आला आहे. प्रस्तुत प्रतिवादीने अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र सादर केले आहे. यावरुन अर्जातील नमूद कारण योग्य आहे असे मानता येईल. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता, निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये असलेले वादाचे निराकरण याच दाव्याचेकामी गुणावगुणावर होणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादीस वादीचा उलट तपास घेणेची संधी देणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत प्रस्तुत प्रतिवादीने वादीस खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## — <u>**आदेश**</u> —

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २ हिला वादीचा उलट तपास घेणेस खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. २ हिने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रुपये ५००/— दयावी. तिने त्यापैकी रक्कम रुपये २००/— वादीस दयावी व उर्वरित रक्कम रुपये ३००/— सरकार जमा करावी.

स्थळ : देवगड
दिनांक : ०९/०६/२०१७

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.